पुण्य नगरी

# कळमेश्वरात भरली 'शैक्षणिक जत्रा'



**मोहपा** जेएसडब्ल्यू फाउंडेशन, नवनिर्मिती एज्युकॅलिटी मुंबई, एकात्मिक बालविकास, पंचायत समिती कळमेश्वरच्या वतीने कळमेश्वर येथे नुकतेच शैक्षणिक जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून पंचायत समिती कळमेश्वर गटविकास अधिकारी अंशुजा घराटे, जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लि. कळमेश्वर प्लांट हेड राजेश जैन, एकात्मिक बालविकास अधिकारी चित्रा घडे, नंदकुमार जाधव, आकांक्षा लेडीज क्लब अध्यक्ष अशू जैन, जिंदल विद्यामंदिर कळमेश्वरच्या प्राचार्य पल्लवी चक्कीलाला, जेएसडब्ल्यू फाउंडेशन कळमेश्वरचे सीएसआर हेड प्रशांत कलशेट्टी, दिलीप गजभिये, ज्येष्ठ पत्रकार आनंद आंबेकर, सतीश नांदे, नवनिर्मिती एज्युकॅलिटी फाउंडेशनच्या ईसीईच्या कार्यक्रमप्रमुख वर्षा नाटेकर होत्या. मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. शैक्षणिक जत्रा मेळाव्यात १३२ अंगणवाड्यांनी सहभाग घेतला होता. ७०० ते ८०० विद्यार्थी व पालकांनी भेट दिली होती. दुसऱ्या दिवशी सेविका व मदतनिसांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सेविकांना कलागुण सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. आयोजनासाठी प्रणीता साटोणे, किरण गोंडाणे, अंगणवाडीसेविका, मदतनीस, पालकवर्ग, नवनिर्मिती एज्युकॅलिटी फाउंडेशनची मुंबईच्या टीम मेंबरनी सहकार्य केले.

Smart Nagpur Edition
Mar 30, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com